# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## आस्थापना विभाग



वाचा:- १) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२०/(सं.क.)/(११४/२०)/विशि-१, दि. १४/०३/२०२०.
२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दि.१४/०३/२०२०
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दि.१६/०३/२०२०
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/आस्था/परिपत्रक/२०२०/३५४५, दि.१५/०३/२०२०

## प रि प त्र क

### अति महत्वाचे व तात्काळ

शासनाने करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि. १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार दि.३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्र क्र.१ व २ अन्वये सूचित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.४ अन्वये विद्यापीठातील संलग्नित सर्व महाविद्यालये व विद्यापीठ परिसरातील सर्व संकुले येथील अध्यापनाचे कामकाज दि. १६/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद करण्याबाबत व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या कार्यालयात उपस्थित रहाणेबाबत सर्व संलग्नित महाविद्यालयात व विद्यापीठ संकुलांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. परंतु शासनाने संदर्भ क्र.३ अन्वये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या कार्यालयात उपस्थित रहाणेबाबत सुधारित आदेश निर्गमित केले आहेत.

त्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्थापक, विद्यापीठ संकुलाचे संचालक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या कार्यालयात उपस्थित रहाणेबाबतचे सुधारित आदेश खालीलप्रमाणे आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१) सर्व संलग्नित महाविद्यालयातील व विद्यापीठ संकुलातील अध्यापक हे दि.२५/०३/२०२० पर्यंत घरी राहून कामकाज ( Work From Home) करु शकतील. तथापि, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास प्रशासकीय कारणास्तव संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु/उपकुलगुरु/कुलसचिव/अधिष्ठाता/उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना महाविद्यालयामध्ये/विद्यापीठामध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

(मागे पहा)

२) विद्यापीठाचे कुलगुरु/उपकुलगुरु/कुलसचिव/ अधिष्ठाता /उपकुलसचिव व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

आदेशावरुन,

17.3.2020

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/परिपत्रक/२०२०/ 3582
दिनांक : 17 MAR 2020

प्रति,

१) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
२) मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
३) कुलसचिव यांचे कार्यालय
४) प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
५) संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
६) विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
७) सुरक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

} सदर परिपत्रक आपल्या संकुलातील / विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

प्रत माहितीस्तव:
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)